**अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य आयोगाच्या 2026 वार्षिक अहवाल संदर्भातील माध्यम प्रश्नांवर अधिकृत प्रवक्त्यांची प्रतिक्रिया**

16 मार्च 2026

अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य आयोगाच्या 2026 वार्षिक अहवाल संदर्भातील माध्यम प्रश्नांवर प्रतिक्रिया व्यक्त करताना अधिकृत प्रवक्ते श्री. रणधीर जैस्वाल म्हणाले,:

आम्ही अलीकडील आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य (USCIRF) वरील अमेरिकन आयोगाच्या अहवालाची नोंद घेतली आहे. भारताविषयी केलेले त्यांचे हेतुपुरस्सर आणि पक्षपाती वर्णन आम्ही स्पष्टपणे नाकारतो.

गेल्या अनेक वर्षापासून USCIRF भारताबाबत असंगत व एकांगी चित्र मांडत आहे आणि यामध्ये निष्पक्ष तथ्यांऐवजी शंकास्पद स्रोत व विचारसरणीवर आधारित कथन यांचे प्रमाण अधिक आहे. अशा वारंवार होणाऱ्या चुकीच्या प्रतिनिधित्वामुळे आयोगाची विश्वासहार्यता ढासळते आहे.

भारताबाबत विशिष्ट कोनातून टीका करण्याच्या भूमिकेऐवजी USCIRF ने अमेरिकेतील हिंदू मंदिरांवरील हल्ले व तोडफोड, भारताचे निवडक लक्ष्यीकरण, तसेच भारतीय वंशीय समुदायावरील वाढती असहिष्णुता व दडपशाही यावर चिंतन करणे अधिक योग्य ठरेल. खरंतर या मुद्द्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

**नवी दिल्ली**

16 मार्च 2026